लोकमत पु. पा. नं १

# अपक्ष उमेदवारांचा चौकसभा, बैठकांवर भर

## मीरा-भाईंदरमध्ये नऊ अपक्ष रिंगणात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात एकूण १७ उमेदवार रिंगणात असून ९ अपक्ष उमेदवार आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या जाहीर सभा होऊन त्यासाठी स्टार प्रचारक येत असले तरी अपक्षांना मात्र चौकसभा, छोट्या बैठकांवरच भर द्यावा लागत आहे.

निवडणुकीत मोठ्या पक्षांच्या उमेदवारांचा जाहीर सभा घेण्यावर भर असतो. कारण जाहीर सभेद्वारे ते स्वतःचे शक्तिप्रदर्शन करत असतात. पक्षाचे मोठे नेते, स्टार प्रचारक यांची भाषणे ही आकर्षण ठरत असल्याने त्यासाठी जाहीर सभांचे आयोजन आवर्जून केले जाते.

मीरा-भाईंदरमध्ये निवडणूक रिंगणात असलेल्या १७ उमेदवारांपैकी ४ उमेदवार हे राष्ट्रीय व राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्षांचे, तर ४ उमेदवार नोंदणीकृत पक्षांचे आहेत. त्यातही महाविकास आघाडीचे काँग्रेसचे मुझफ्फर हुसेन आणि भाजप महायुतीचे नरेंद्र मेहता या दोन उमेदवारांनी मोठे पक्ष म्हणून सभा घेतल्या आहेत. त्याव्यतिरिक्त अन्य पक्षांची ठळक अशी जाहीर सभा दिसली नाही.



### पक्षीय पाठबळ नसल्याने अडचण

- ९ अपक्ष उमेदवारांमध्ये विद्यमान अपक्ष आ. गीता जैन, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी जिल्हाध्यक्ष, माजी उपनगराध्यक्ष अरुण कदम, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष बंडखोर हंसुकुमार पांडे हे तीन प्रमुख अपक्ष उमेदवार लढत आहेत. यापैकी आ. जैन या जागोजागी जाहीर सभा घेत आहेत.
- त्यांच्या जाहीर सभांमध्ये स्टार प्रचारक त्या स्वतःच आहेत, तर दुसरीकडे अरुण कदम व हंसुकुमार पांडे हे दोघेही लहान लहान चौक सभा, छोट्या बैठका यावर भर देत आहेत. पक्षाचे पाठबळ, त्यातही मोठा पक्ष नसल्याने अपक्ष उमेदवारांना प्रचारासाठी स्वतःवरच अवलंबून राहावे लागत आहे.



# टास्क पूर्ण करण्यास सांगून फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पैसे कमावण्याच्या आमिषाने टास्क पूर्ण करण्यास सांगून सायबर लुटारूंनी दोघांची २२ लाखांना फसवणूक केल्याप्रकरणी काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा रोडच्या अपना घर फेस २ मध्ये राहणाऱ्या आशा बोरळ यांना ग्रेस पॅकर नावाच्या व्यक्तीने ऑनलाइन ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. पाच टास्क पूर्ण करण्यास सांगून त्यातून मिळणाऱ्या पैशांचे आमिष दाखवले. बोरळ यांनी यूपीआय आयडीच्या माध्यमातून ११ लाख २७ हजार ५३९ रुपये कोणतीही ओळख नसणाऱ्या अनोळखी व्यक्तींना ट्रान्सफर केले. मात्र त्यांची फसवणूक झाली. तसेच हेडली हेन्री फर्नांडिस यांनाही गुगल रिव्ह्यू टास्क पूर्ण करण्याचे व गुंतवणूक करण्यास सांगून यूपीआय आयडीद्वारे १० लाख ६९ हजार ६३० रुपये उकळले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनीही पोलिस ठाण्यात धाव घेतली.

# वसईत निवडणुकीचे फलक फाडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** वसई विधानसभा मतदारसंघामधील महाविकास आघाडीचे उमेदवार विजय पाटील यांचे नालोसापारा पश्चिमेच्या गास गावात लावलेले प्रचार फलक सोमवारी रात्री अज्ञात व्यक्तींनी फाडले. हे कृत्य विरोधकांनी केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. याप्रकरणी नालासोपारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसचे उमेदवार विजय पाटील हे रिंगणात उतरले आहेत.



विजय पाटील यांनी प्रचारासाठी गास गावात फलक लावले होते. सोमवारी रात्री हे फलक अज्ञात इसमांनी फाडले. त्यामुळे या भागात तणाव निर्माण झाला होता. आम्हाला वाढता प्रतिसाद पाहता फलक फाडले असल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे.

लोकमत ७.पा.नं.१

# वसईतील २९ गावांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

## पालिकेतून वगळणार की कायम राहणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** वसई - विरार महापालिकेच्या स्थापनेपासूनच वादाचा विषय ठरलेला २९ गावांचा मुद्दा महाविकास आघाडीने निवडणुकीच्या प्रचारात मांडला आहे. या गावांना महापालिकेच्या हद्दीतून वगळण्याचे आश्वासन मविआने दिले आहे. दुसरीकडे बहुजन विकास आघाडी मात्र आधीपासूनच २९ गावे महापालिका हद्दीत राहावीत, या मताची असून, महायुतीने मात्र आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत २९ गावांतील नागरिकांच्या भूमिकेकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

वसई - विरार महानगरपालिकेची स्थापना १५ वर्षांपूर्वी झाली, मात्र या २९ गावांमधील ग्रामस्थांचा महापालिकेत समाविष्ट होण्यास तीव्र विरोध कायम आहे. महापालिकेच्या कार्यक्षमतेबाबत नाराजी व्यक्त करत या गावांतील नागरिकांनी वारंवार महापालिकेच्या हद्दीतून वगळण्याची मागणी केली आहे.



### निवडणुकीत गावांचा मुद्दा किती प्रभावी?

मविआने या गावांचा मुद्दा प्रचाराच्या केंद्रस्थानी ठेवत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, हा मुद्दा प्रत्यक्ष मतांवर किती प्रभाव टाकतो, हे निवडणुकीनंतरच स्पष्ट होईल. दरम्यान, प्रचाराचा जोर वाढत असताना या मुद्द्याने स्थानिक राजकारणात वेगळे वळण येण्याची शक्यता आहे. या गावांचा तिढा केवळ प्रचारापुरताच मर्यादित राहतो की प्रत्यक्ष कृतीत येतो, हे निकालानंतरच पाहायला मिळणार आहे.

- **मविआचे नेते उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी लोकसभा निवडणुकीतही या गावांचा मुद्दा उचलून धरला होता. तेव्हा ग्रामस्थांसमोर गावांना महापालिकेतून वगळण्याचे आश्वासन दिले होते. यावेळी पुन्हा तोच मुद्दा प्रचारात मांडत मविआने ग्रामस्थांना स्वायत्ततेचा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. सत्ता आल्यास ही गावे महापालिकेच्या हद्दीतून वगळण्यात येतील, असे स्पष्ट आश्वासन मविआने दिले आहे.**

# सदनिकेच्या नावे फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** कांदिवलीच्या चारकोप येथे राहणाऱ्या नंदकिशोर तावडे (६२) यांची २० ऑगस्ट २०१४ ते २०२३ दरम्यान सदनिकेच्या नावावर लाखोंची फसवणूक झाली आहे.

तावडे हे नवीन रूमच्या शोधात होते. त्यांचे नातेवाईक सुभाष तावडे यांच्या ओळखीचे असलेले साई प्रणाली बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्सतर्फे प्रतीक बारोट (३५) यांनी तुळींज रोडवरील देवशेतपाडा येथील रमा निवासमधील सदनिकेचा ६ लाख ६० हजारांना व्यवहार केला. त्यातील ११ हजार रोख आणि ३ लाख ८९ हजार रुपयांचा चेक, असे ४ लाख घेतले व उर्वरित २ लाख ६० हजार ताबा मिळाल्यावर देण्याचे ठरले. मात्र, मागील ५ वर्षांपासून त्यांना रूम देण्यासाठी टाळाटाळ करीत होता. तसेच शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. तुळींज पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पा.नं.५



मुंबई-अहमदाबाद महामार्गावर खानिवडे टोलनाका येथे वाहतूक करणाऱ्या ट्रकमधून रेल्वेची चाके पडली. यावेळी सुदैवाने मोठा अपघात टळला.

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर ट्रकमधून पडली रेल्वेची चाके

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर खानिवडे टोलनाका येथे मुंबईच्या दिशेने घेऊन जात असलेली रेल्वेची चाके वाहतूक करणाऱ्या ट्रकमधून पडली. मात्र, यावेळी समोरून कोणतेही वाहन न आल्याने मोठा अपघात टळला आहे. ही घटना सोमवारी रात्री ९ च्या सुमारास घडली.

रेल्वेची चाके ट्रकमधून अहमदाबादवरून मुंबईकडे घेऊन जात असताना खानिवडे टोलनाका येथे येताच चाकांना बांधलेली साखळी सैल झाल्याने यामधून चाके महामार्गावर पडली.

ट्रकमधून चाके पडली तरी ट्रक चालकास याचा अंदाज न आल्याने तो दोन कि.मी. पुढे जाऊन थांबला. मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवर मध्येच चाके पडली असल्याने मोठी वाहतूककोंडी झाली. यामुळे पुन्हा एकदा अवजड वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पुण्यनगरी मु.पा.नं.3

# छटपूजेनंतर जूचंद्र गोडे तलाव दूषित

## नागरिक संतप्त, कार्यक्रमांना मज्जाव करण्याची मागणी

**वसई :** छटपूजेमुळे नायगाव येथील गोडे तलावातील पाणी दूषित झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. अशा कार्यक्रमांना या तलावावर परवानगी देण्यात येऊ नये, अशी मागणी करण्यात येत आहे.



नायगाव-जूचंद्र येथील गोडे तलावावर येथील हजारो नागरिक पारंपरिकरित्या धुणी धुवायला जातात. त्यात अनेक जण आंघोळ ही करतात. मात्र,या तलावावर छटपूजा करताना पाण्यात हार-तुरे, तेलाने भरलेले दिवे, निर्माल्य टाकण्यात आल्यामुळे तलावाचे पाणी दूषित झाले आहे. पाण्यावर तेलाचा तवंग पसरला आहे. परिणामी या पाण्याचा कोणत्याही कामासाठी वापर करता येत नसल्यामुळे नागरिकांना संताप व्यक्त केला आहे.

नागरिकांच्या वापरात असलेल्या तलावावर किंवा कोणत्याही पाण्याचा स्त्रोतावर पूजा करण्याची परवानगी देताना, पाण्यात तेलकट किंवा कुजकट पदार्थ सोडण्याची मनाई करण्यात यावी, ही परवानगी न मानणाऱ्यांना पूजेची परवानगी नाकारण्यात यावी. याची दक्षता महापालिकेकडून घेण्यात आली नाही. तसेच छटपूजेनंतर दूषित झालेल्या तलावाची स्वच्छताही करण्यात आली नाही. यामुळे गेल्या काही दिवसांपासून तलावाचे पाणी वापरण्यास अयोग्य ठरत आहे. त्यामुळे गोडे तलाव तात्काळ स्वच्छ करावा, अशी मागणी नागरिकांनी लावून धरली आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पु.पा.नं ७

# बंद कारमध्ये सापडला १३.५ किलो गांजा

## ▌गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई



▌**वसई :** महामार्गावर बंद अवस्थेत असलेल्या एका कारमध्ये १३.५ किलो गांजा गुन्हे प्रकटीकरण शाखेने हस्तगत केला आहे. या मालाची किंमत ८.५ लाखांहून जास्त असल्याचे पोलिसांनी सांगितले. वसई तालुक्यात अमली पदार्थ आणि गावठी दारुचे अड्डे फोफावले होते. निवडणूक काळात त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना पोलीस आयुक्तांकडून देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष- ३ आणि विरार पोलिसांनी पेट्रोलिंग केली असता, मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील गुजरात वाहिनीवरील शिवाचा पाडा जवळ बंद अवस्थेत एका कार आढळली.

या कारमधून संतोष जैसवार आणि विकास झिजुटें हे मानखुर्दमधील तरुण गांजा घेऊन आले होते. त्यांच्यावर झडप घातल्यावर १३.५ किलोग्रॅम वजनाचा ८ लाख ७२ हजार ७६० रुपये किमतीचा गांजा त्यांच्याकडे सापडला. दोघांच्या मुसक्या आवळल्यानंतर पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, उपनिरीक्षक उमेश भागवत, ज्ञानेश्वर आव्हाड, हवालदार मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, अश्वीन पाटील, राकेश पवार, युवराज वाघमोडे, सुनील पाटील, आतिष पवार, मनोहर तारडे, तुषार दळवी, प्रवीण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे यांनी ही कामगिरी केली.

# तोतया पोलिसांनी लुटली भररस्त्यात वृद्धाची चेन

▌**वसई :** भररस्त्यात एका वृद्धेच्या गळ्यातील सोन्याची चेन तोतया पोलिसांनी लुटून नेल्याची घटना वसईत घडली आहे. या घटनेमुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वसईच्या एव्हरशाईनमधील गैरीशंकर यादव (७०) हे थॉमस चर्चजवळून पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांना अडवले. आणि त्यांना पोलीस असल्याची आरोपींनी बतावणी करत रात्री या ठिकाणी चोरी झालेली असताना, तुम्ही गळ्यात सोन्याची चेन का घालून फिरता? असे दरडावले. त्यानंतर यादव यांच्या गळ्यातील सोन्याची चेन काढून कागदाच्या पुडीत बांधून त्यांना त्या चोरट्यांनी परत दिली आणि ते निघून गेले.

ते गेल्यावर यादव यांनी कागदाची पुडी उघडली असता, त्यात दोन दगड आढळले. यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येऊन यादव यांनी पोलीस ठाणे गाठले. त्यांच्या तक्रारीनंतर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पा. नं. ८

# लग्नाच्या भूलथापा देऊन तरुणीवर अत्याचार

## आरोपीला मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून अटक

**वसई :** लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार करून तिचे व्हिडिओ सोशल मिडियावर टाकणाऱ्या आरोपीला मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे.

विरारमधील एका २१ वर्षीय तरुणीशी ओळख करून हफीजुल्लाह आजिजुल्लाह खान याने लग्नाचे आमिष देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता. त्यानंतरही त्याने लग्नाचा विषय न काढल्यामुळे पीडितेने शारीरिक संबंध ठेवण्यास नकार दिला. यामुळे संतप्त होऊन खान याने तिला शिवीगाळ करून मारहाण केली होती. त्यानंतर त्याने तिचे बनावट इन्स्टाग्राम आयडी बनवून त्यावर खासगी आणि अर्धनग्न अवस्थेतील फोटो/व्हिडिओ प्रसारित केले.



त्यामुळे पीडितेने विरार पोलीस ठाण्यात धाव घेतली. तिच्या दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी विरार पोलीस खानचा शोध घेत होते. मात्र तो वेळोवेळी आपला ठावठिकाणा बदलत होता. त्यामुळे तांत्रिक विश्लेषण आणि मिळालेल्या माहितीनुसार हफीजुल्लाह आजिजुल्लाह खान आरटिओ ऑफिस, चंदननगर, विरार (पूर्व) येथे येणार असल्याचे समजले. त्यानुसार हवालदार राजाराम काळे, संतोष मदने, हनुमंत सूर्यवंशी यांनी सापळा लावून खानला ताब्यात घेतले.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल राख, धनंजय पोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, उपनिरीक्षक हितेंद्र विचारे, सहाय्यक उपनिरीक्षक श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, गोविंद केंद्रे, सतीश जगताप, राजविर संधु, महेश वेल्हे, अनिल नागरे, अखिल सुतार, साकेत माघाडे, नितीन राठोड, अंगद मुळे, संतोष चव्हाण यांनी ही कामगिरी केली.

पुढारी पा. नं. ५

# ऑनलाईन फसवणूक; ५ लाख रुपये परत

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

काशीमीरा परीसरात राहणाऱ्या इसमाला शेअर मार्केट ॲपमध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन ५ लाखाची फसवणुक करण्यात आली होती. काशीगाव पोलिसांनी तपास करून फसवणूक करण्यात आलेले ५ लाख रूपये तक्रारदार यांना परत मिळवुन दिले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा परीसरात राहणारे पप्पू प्रेमचंद्र झा यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवण्याचे आमिष दाखवुन आर्थिक फसवणूक केली होती. या फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्यात भादंविसं. कलमासह माहीती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियमाच्या विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. मिळालेल्या माहितीचे अवलोकन केले असता, तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसून आले.

त्यानुसार तक्रारदार यांची रक्कम गोठवण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठवण्यात आली. त्यानंतर न्यायालयाकडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळवण्यासाठी काशिगाव पोलीस ठाणेचे अधिकारी, अंमलदार यांनी वेळो-वेळी पाठपुरावा करून तक्रारदार यांची फसवणुक झालेली संपूर्ण रक्कम ५ लाख त्यांच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आले आहेत.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पा. नं. 3



# चोरीच्या २० सायकली जप्त

## सायकल चोरी करणारा आरोपी गजाआड

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा रोड परिसरात सायकल चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला काशीगांव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करून त्याच्याकडून २० चोरीच्या सायकली जप्त केल्या आहेत.

काशिगाव पोलीस ठाणे हद्दीतील गगनगिरी चाळ, मिनाक्षी नगर येथे राहणाऱ्या काजल भारत वानखेडे यांनी त्यांच्या घरासमोर ९ नोव्हेंबर रोजी रात्री सायकल उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली म्हणून त्यांनी काशिगांव पोलीस ठाण्यात अनोळखी इसमा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशिगांव पोलीस ठाणे हद्दीमध्ये तसेच परिमंडळ १ मिरा रोड, मिरा-भाईंदर हद्दीमध्ये सायकल चोरीच्या तक्रारी वाढल्याने वरिष्ठांनी आरोपीचा शोध घेऊन गुन्हे उघड करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्या प्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून आरोपीची माहिती मिळवली.

दरम्यान या गुन्ह्यात बिगारी काम करत असलेल्या आरोपी मिर्झानूर रेहमान मंडल (३१), रा. हैदरी चौक, नयानगर, मिरारोड (पु.) मूळ राहणार गाव बेकी, पो. ठाणा मटीया ता. भौसीरहाट, जि. उत्तरचब्बीस परगणा , पश्चिम बंगाल याला अटक केली आहे.

या गुन्ह्यातील फिर्यादी यांची चोरी केलेली सायकल तसेच आरोपीने इतर वेगवेगळ्या ठिकाणी चोरी केलेल्या १५ हजार रुपये किमतीच्या विविध कंपनीच्या २० सायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

दरम्यान या सायकल चोरी प्रकरणातील अटक आरोपी मिर्झानुर मंडल हा सायकल चोरीचे गुन्हे करण्यात सराईत करून त्याच्या विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्याचा अभिलेख पाहिला असता त्याच्या विरुद्ध यापूर्वी १ गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तोगरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रताप पाचुंदे हे करत आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पा. नं. १



# नैसर्गिक नाला बुजविण्याचा प्रयत्न

## नागरिकांच्या जागरूकतेपणामुळे प्रकार उघड

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारा-विरार लिंक रोडवर असलेला नैसर्गिक नाला राडारोडा टाकून बुजविला जात असल्याचा प्रकार मंगळवारी नागरिकांनी जागरूकतेमुळे उघडकीस आला. पालिकेने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

नालासोपारा पश्चिमेपासून विरारला जाण्यासाठी नवीन लिंक रस्ता दोन वर्षांपूर्वी तयार करण्यात आला आहे. हा रस्ता म्हाडा वसाहतीमधून पालिकेच्या नव्या मुख्यालय इमारतीकडे जातो. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला नैसर्गिक नाले आहेत. त्यातून पाणी वाहून नेले जाते. पालिका या नाल्यांतील गाळ काढून नाला स्वच्छ करत असते.

मंगळवारी दुपारी जेसीबीच्या साहाय्याने काही जण नाल्याशेजारी असलेला राडारोडा नाल्यात टाकून नाला बुजवत होते. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे विधि अधिकारी ॲड. रोहन खाडे आणि काँग्रेसचे नेते कॅप्टन नीलेश पेंढारी या परिसरातून जात होते. त्यांनी हा प्रकार पाहिला.

कॅप्टन पेंढारी यांनी संबंधितांकडे विचारणा केली असता त्यांनी महापालिकेचे कर्मचारी असल्याचे सांगितले आणि उडवाउडवीची उत्तरे दिली. काही वेळातच ते काम थांबवून जेसीबीसह निघून गेले. महापालिकेचे कर्मचारी नाला बुजविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप कॅप्टन नीलेश पेंढारी यांनी केला आहे. नाल्याच्या बाजूला राडारोडा आणून टाकायचा आणि हळूहळू तो राडारोडा नाल्यात टाकून नाला बुजवायचा असा हा प्रकार केला जात असल्याचे कॅप्टन पेंढारी यांनी सांगितले. नाला बुजविण्याचा हा प्रकार त्यांनी थेट चित्रित करून समाजमाध्यमावर टाकला.

दरम्यान, अशा प्रकारचे कुठलेही काम महापालिकेमार्फत करण्यात आलेले नाही, असे प्रभाग समिती 'अ'चे (बोळिंज) प्रभारी साहाय्यक आयुक्त शशिकांत पाटील यांनी सांगितले. पालिकेचे उपायुक्त (घनकचरा) नानासाहेब कामठे यांनी हा प्रकार गंभीर असल्याचे म्हटले आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पा. नं. 1

# धारावी प्रकल्पग्रस्तांचा वसईत पुनर्वसनाचा प्रयत्न

## आमदार क्षितीज ठाकूर यांचा आरोप

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** वसई पश्चिमेच्या सनसिटी येथील मिठागरच्या पंधराशे एकर जागेवर धारावी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप नालासोपाऱ्याचे आमदार क्षितीज ठाकूर यांनी केला आहे. यासाठी मिठागराच्या जागा ताब्यात घेण्यासाठी केंद्रीय पातळीवरून हालचाली सुरू असल्याचे ते म्हणाले. वसईचे धारावी होऊ देणार नाही आणि हा प्रस्तावित प्रकल्प आम्ही हाणून पाडू असा इशाराही त्यांनी दिला आहे.

वसई शहराच्या पश्चिमेस रेल्वे स्थानकालगत असलेली सोपारा, आचोळे, नवघर-माणिकपूर, दिवाणमान अशी जवळपास पंधराशे एकर जागा महाराष्ट्र शासनाने गोगटे सॉल्ट या कंपनीस मिठागरासाठी रासायनिक प्रकल्पासाठी भाडेतत्वावर दिली गेली होती.

पहिल्या कराराप्रमाणे रासायनिक प्रकल्प झाला नाही. त्यामुळे स्थानिकांना नोकऱ्याही मिळाल्या नाहीत. त्यानंतर या कंपनीला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली. ही मुदत २०१४ साली संपुष्टात आली. मात्र केंद्र सरकारने आता ही जागा धारावी पुनर्विकास योजनेदरम्यान स्थलांतरित होणाऱ्या अपात्र रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासाठी वापरण्याचे ठरवले आहे. यासाठी राज्यातील मिठागरांच्या जागा ताब्यात घेण्यासाठी केंद्रीय पातळीवर योजना आखल्या जात असल्याचा आरोप क्षितीज ठाकूर यांनी केले आहे. मुंबईतील धारावी ही आशियातील दुसऱ्या क्रमांकाची झोपडपट्टी म्हणून ओळखली जाते. अदानी समूहातर्फे (पान ३ वर)

### 'मिठागराच्या जागेवर रुग्णालय उभारा'

मिठागराची जागा वसई-विरार महापालिकेला हस्तांतरित करण्यात यावी तसे केल्यास तेथे वांद्रे-कुर्ला व्यावसायिक संकुलाच्या धर्तीवर जागेचा विकास करता येऊ शकेल, अशी संकल्पना क्षितीज ठाकूर यांनी मांडली होती. त्यासाठी त्यांनी वेळोवेळी सरकार दरबारी पाठपुरावाही केलेला होता. ही जागा पुनर्वसन प्रकल्पाला देण्याऐवजी या जागेवर वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय, क्रीडा संकुल, आयटी पार्क उभारावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

म. टा. पु. पा. क्रं. ९

# आमदार जैन यांचा पोलिस ठाण्यात ठिय्या

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

भाईंदरच्या नवघर पोलिस ठाण्यात आमदार गीता जैन यांनी सोमवारी ठिय्या आंदोलन केले. त्यांच्या एका सहकाऱ्याला पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले होते. भाजप उमेदवार नरेंद्र मेहतांच्या सांगण्यावरून पोलिसांनी दबावाखाली नियम धुडकावून ही कारवाई केल्याचा आरोप जैन यांनी यावेळी केला.

नवघर पोलिस ठाण्यात एक व्हिडिओ पसरवल्याप्रकरणी आयटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजपचे माजी आमदार मेहता त्यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आमदार जैन यांचा छायाचित्रकार असणाऱ्या हर्ष शहाला नवघर पोलिसांकडून सोमवारी दुपारी ताब्यात घेण्यात आले. गणवेशात नसलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांकडून जैन यांच्या कार्यालयाजवळ हर्षला ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर जैन यांनी नवघर पोलिस ठाणे गाठून ठिय्या आंदोलन सुरू केले. विरोधी उमेदवार असणारे नरेंद्र मेहता यांच्या सांगण्यावरून हर्षला नोटीस न बजावता व त्याच्या कुटुंबीयांना न सांगता नियम धुडकावून ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप जैन यांनी यावेळी केला. नवघर पोलिसांनी मात्र नियमानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले.

# वसई धर्मप्रांत बिशपपदी थॉमस डिसोजा

**म. टा. वृत्तसेवा, वसई**



वसई धर्मप्रांताचे बिशप फेलिक्स मच्याडो यांच्या निवृत्तीनंतर बिशपपदी फादर थॉमस फ्रान्सिस डिसोजा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इटलीच्या व्हॅटिकन सिटीचे बिशप पोप यांनी ही नियुक्ती जाहीर केली असून वसई धर्मप्रांताचे ते तिसरे बिशप ठरले आहेत.

२००९ सालापासून वसई धर्मप्रांताच्या बिशपपदी फेलिक्स मच्याडो हे होते. आर्चबिशप फेलिक्स मच्याडो हे जून २०२४ रोजी निवृत्त झाले होते. त्यामुळे नव्या बिशपांच्या नियुक्तीची प्रक्रिया मागील पाच महिन्यांपासून सुरू होती. यामध्ये तीन नावांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर नुकताच इटलीच्या व्हॅटिकन सिटी येथील बिशप पोप यांनी वसई धर्मप्रांताच्या प्रमुखपदी फादर थॉमस फ्रान्सिस डिसोजा यांची नियुक्ती जाहीर केली आहे.

फादर थॉमस डिसोजा हे सध्या नंदाखाल धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू म्हणून कार्यरत आहेत. तर मूळचे ते चुळणा गावचे रहिवासी आहेत. तर नागपूर धर्मप्रांताचे आर्च बिशप एलयास घोन्सालविस त्यांचे आतेबंधू आहेत. धर्मगुरू असताना त्यांनी मद्रास विद्यापीठामधून तत्वज्ञान व ईशज्ञान ह्या विषयात मास्टर्स केले व युनिव्हर्सिटीमधून हुशार विद्यार्थी व अंतिम परीक्षेमध्ये पहिला येण्याचा मान मिळवला होता. सामाजिक कार्याचे वलय असणाऱ्या फादर थॉमस डिसोजा यांची वसई धर्मप्रांताचे तिसरे बिशप व चुळण्यातील दुसरे बिशप म्हणून नियुक्ती झाल्याने चुळण्यात आणि वसईत आनंदाचे वातावरण पसरले आहे.


CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

N.B.T. पा.नं. 2

# 'फिल्म बनाने के नाम पर की थी चीटिंग'

## हाई कोर्ट के आदेश के बाद मीरा रोड पुलिस ने दर्ज किया केस

File Pics



■ निसं, वसई: बॉलीवुड के कोरियोग्राफर रेमो डिसूजा और उनकी पत्नी लिजेल समेत पांच लोगों पर एक डांस ग्रुप ने चीटिंग का मामला दर्ज कराया गया था। इस मामले में उनसे पूछताछ की गई है। बताया जा रहा है कि नायगांव, भाईदर और मुंबई के अलग-अलग उपनगरों से डांस के शौकीन युवाओं ने 'वी अनबीटेबल' नाम से एक डांस ग्रुप बनाया था। इस ग्रुप ने एक डांस प्रतियोगिता जीती और अमेरिका गॉट टैलेंट में दूसरा स्थान हासिल किया था। डांस डायरेक्टर रेमो डिसूजा ने इन युवाओं की जिंदगी पर फिल्म बनाने का ऐलान किया था। ग्रुप के युवाओं के आरोप हैं कि ग्रुप के मैनेजर ओमप्रकाश चौहान ने एक ग्रुप अकाउंट, एक सोशल मीडिया अकाउंट भी बनाया था। विभिन्न प्रतियोगिताओं व कार्यक्रमों से मिली रकम, पुरस्कार राशि, फिल्मों आदि के लिए मिलने वाली धनराशि का गबन किया गया है। नवघर पुलिस और मीरा रोड पुलिस स्टेशन में उनकी शिकायत नहीं ली गई। इसके बाद उन्होंने बॉम्बे हाई कोर्ट का दरवाजा खटखटाया। कोर्ट ने इस मामले में केस दर्ज करने का आदेश दिया था। इसके बाद मीरा रोड पुलिस स्टेशन में केस दर्ज हुआ। कोरियोग्राफर रेमो डिसूजा, उनकी पत्नी लिजेल डिसूजा, मैनेजर ओमप्रकाश चौहान, पुलिसकर्मी विनोद राउत, रमेश गुप्ता, रोहित जाधव के खिलाफ 11 करोड़ 95 लाख रुपये की धोखाधड़ी का आरोप है। इस मामले में मंगलवार को रेमो डिसूजा व उनकी पत्नी को क्राइम ब्रांच कार्यालय में पूछताछ के लिए बुलाया गया था। क्राइम ब्रांच ने लगभग छह घंटे पूछताछ की है।

**डांस ग्रुप की शिकायत दर्ज नही की, हाई कोर्ट में दायर की याचिका**

# शराब पीकर महिला ने किया हंगामा

■ निसं, विरार: गास कोपरी इलाके में रहने वाली एक 29 वर्षीय महिला सोमवार की सुबह शराब पीकर पुलिस स्टेशन पहुंच गई। आरोप है कि उसने शराब के नशे में अपनी दोनों बेटियों का गला घोंटने की कोशिश की थी। उसकी बेटियां भी पुलिस स्टेशन पहुंची। महिला ने पुलिस स्टेशन में जमकर बवाल मचाया। महिला पुलिस कर्मियों ने उसे समझाने का प्रयास किया, लेकिन महिला धक्का-मुक्की और गाली गलौज करने लगी। फिलहाल पुलिस ने विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज किया है। बताया जा रहा है कि महिला का पति गांव में रहता है। वह अपनी दो बेटियों के साथ गास कोपरी में रहती है। फिलहाल उसे नोटिस देकर छोड़ दिया गया है।

CamScanner
Scanned with OKEN Scanner

दैनीक भास्कर पा.नं. ५

# विवादित पोस्ट: सोशल मीडिया पर पुलिस की पैनी नजर

भास्कर संवाददाता | वसई

विधानसभा चुनाव को लेकर मीरा-भायंदर, वसई-विरार शहर आयुक्तालय एक्टिव मोड पर है। सोशल मीडिया पर विवादित और भ्रामक पोस्ट करने वाले के खिलाफ पुलिस कार्रवाई करने की योजना बनाई है। बाकायदा एक टीम का गठन भी किया गया है।

सायबर सेल के सुमित कुमार गूंजकर ने बताया कि चुनाव के दौरान सोशल मीडिया के तमाम प्लेटफॉर्म की निगरानी का खाका तैयार किया गया है। साइबर सेल को इसकी जिम्मेदारी दी गई है। उन्हें फेसबुक, एक्स, इंस्टाग्राम, व्हॉट्सएप आदि की लगातार मॉनिटरिंग करनी है। इसमें आपत्तिजनक पोस्ट करने या दंगा भड़कने, जाती वाचक वाक्य आदि पोस्ट पर नजर रखना है। इसके अलावा चुनाव में उतरे उम्मीदवार, उनके समर्थक या पार्टी से जुड़े पदाधिकारियों की पोस्ट, टिप्पणी और फोटो पर भी पैनी नजर रहेगी। इसके साथ ही केवल सार्वजनिक स्थानों पर पांच से ज्यादा लोगों के इकट्ठा होने पर मनाई आदेश जारी किया गया है। इसके अलावा विधानसभा चुनाव में आचार संहिता का उल्लंघन सोशल मीडिया पर भी हो सकता है।



# महाविकास आघाडी के उम्मीदवार का फाड़ा पोस्टर

भास्कर संवाददाता | वसई




वसई में महाविकास आघाडी के उम्मीदवार विजय पाटील का पोस्टर फाड़ने का मामला सामने आया है। इस घटना से क्षेत्र में तनाव का माहौल है। कांग्रेस पार्टी ने आरोप लगाया कि यह करतूत विरोधियों की है। इस मामले को लेकर कांग्रेस ने नालासोपारा पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज कराई है।

वसई 133 विधानसभा क्षेत्र से कांग्रेस महासचिव और उम्मीदवार विजय पाटील चुनाव मैदान में हैं। इस विधानसभा से बहुजन विकास आघाडी के हितेंद्र ठाकुर और महायुति (भाजपा) से स्नेहा दुबे चुनाव लड़ रही हैं। पुलिस के मुताबिक, सोमवार रात नालासोपारा (पश्चिम) गास गांव में आघाडी के उम्मीदवार का पोस्टर लगाया गया था।

## नालासोपारा पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज



सुबह लोगों ने देखा कि पाटील का पोस्टर फाड़ा गया है। उन्होंने इसकी सूचना कांग्रेस नेताओं दी। पोस्टर फाड़ने से नाराज कांग्रेस समर्थक सड़क पर एकत्र हो गए। स्थिति को संभालने के लिए पुलिस को बुलाया गया। पुलिस ने अज्ञात व्यक्ति के खिलाफ मामला दर्ज कर जांच शुरू कर दी है।

# योगी आदित्यनाथ की आज मीरा रोड में सभा

भास्कर संवाददाता | भायंदर.



उत्तर प्रदेश के मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ का बुधवार को मीरा रोड में आगमन होगा। शाम 4.30 बजे एस. के स्टोन ग्राउंड में मीरा-भायंदर विधानसभा सीट से महायुति के उम्मीदवार नरेंद्र मेहता की प्रचार सभा को संबोधित करेंगे। सभा का समय पहले 6 बजे तय हुआ था, लेकिन उसमें बदलाव किया गया है। एक संवाददाता सम्मेलन को संबोधित करते हुए मेहता ने कहा कि निर्दलीय उम्मीदवार भाजपा नेताओं के नाम का उपयोग करना बंद कर दें, अन्यथा उनके खिलाफ कार्रवाई होगी। हिंदू वोटों का बंटवारा करने के लिए वह लोगों को गुमराह कर रहीं हैं।


CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal

Hindustan Times



Anna Durai Devendar



Murugesh Perumal

# 2 THIEVES STEAL FROM SCHOOL, THEN SLEEP IN A CLASSROOM

**Megha Sood**

megha.sood@htlive.com

**MUMBAI:** Two 55-year-old thieves slept for five hours in a classroom of the school they allegedly stole from, before boarding the first train from Dahisar to Nalasopara. The police have arrested the two accused for allegedly stealing ₹85,000, and ₹1 crore worth FD documents crore from a school in Borivali East on September 27.

According to Kasturba Marg Police, the accused, Anna Durai Devendar and Murgesh Devendar are residents of Diva and Nalasopara respectively. The principal of the Seth DM High School had complained to the police on September 27 that the office of the superintendent had been broken into. ₹85,000 in cash and documents related to fixed deposits worth ₹1 crore had been allegedly stolen. Based on the complaint, the police had registered a case of theft under section 305 (a) (theft) and 331 (3) (housebreaking to commit offense) (4) (housebreaking at night) of the Bhartiya Nyaya Sanhita against unknown persons.

After going through the CCTVs footage, the police saw two masked men enter the school premises from the back gate while the watchman was stationed on the front gate at 12am. They robbed the premises and slept in a classroom. At 5am, the footages showed the men leaving in the rain, clad in a raincoat and a rainbow-coloured umbrella hiding their faces. "The two have been arrested and produced before the court where they were remanded to police custody," added the officer.

The police said that Anna Durai, who frequently stays at his sister's house in Malwani, has a prior theft case against him in 1999

# 50% decline in birds noted at Uttan camp

**Suresh Golani**

MIRA BHAYANDAR

In the fourth year of the bird-watching camp held in Uttan near Bhayandar, 50% decline was witnessed in the number of species.

The three-day camp organised between November 6 and 8 by social organisation For Future India under the forest department as part of the Maharashtra bird week, is observed between November 5 and 12 to mark the birthday (5 November) of ornithologist Maruti Chitampalli and the birth anniversary (November 12) of Dr Salim Ali, also known as the 'birdman of India'.

"In the three years between 2021 and 2023, participants observed more than 40 different bird species in two hours. However, this year, less than 20 species were observed apparently due to forest degradation, tidal inundation, encroachment and human interference," said Harshad Daghe of For Future India.

Apart from officials from the forest department, eminent bird lovers including Amey Bhogte, Suchitra Palaye and Abraham Murugan shared their insights and highlighted the importance of taking conservation measures to stop the alarming decline in the number of species and migratory birds.

Some of the bird species, which were spotted include drongo, common kite, pond heron, purple heron, grey heron, great egret, little egret, intermediate egret, green bee-eater, painted stork, bulbul, myna, black kite, weaver, black-headed ibis, common crow, glossy ibis, Indian grey hornbill and white-bellied sea eagle. Citizens and bird lovers have expressed dissatisfaction over the sharp decline witnessed recently.

Scanned with OKEN Scanner